सचिव व सचिव समकक्ष दर्जाच्या कार्यकारी संचालक / महासंचालक यांची बदली रद्द करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन आदेश क्रमांकः एसएलएस-१४१७/(२६६/२०१७)/भाग-१/आ (वर्ग-१)

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
तारीख: १७ नोव्हेंबर, २०१७.

वाचा:- जलसंपदा विभाग, शासन आदेश क्र.एसएलएस-१४१७/(२६६/२०१७)/आ.(वर्ग-१).. (१), दि.०१.११.२०१७.

शासन आदेश :-

सक्षम प्राधिकरणाच्या मान्यतेने संदर्भीय आदेशान्वये श्री.राम बसवंतराव घोटे, कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांची कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ,जळगांव या रिक्त पदी बदलीने नियुक्ती करण्यात आली होती.

२. आता, सक्षम प्राधिकरणाच्या मान्यतेने व प्रशासकीय कारणास्तव, श्री.राम बसवंतराव घोटे यांची संदर्भीय आदेशान्वये झालेली बदली रद्द करुन त्यांची पदस्थापना कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे या रिक्त पदावर करण्यात येत आहे.

३. तसेच, कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव या रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार श्री.संजय देविदास कुलकर्णी, मुख्य अभियंता, तापी पाटबंधारे विकास महामंडळ,जळगांव यांच्याकडे सोपविण्यात येत आहे. श्री.कुलकर्णी यांनी सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार हा स्वत:च्या नियमित पदाचा कार्यभार सांभाळून पुढील आदेश होईपर्यंत पहावा.

४. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१११७१३२८०७१६२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vijay K. Chaudhari

Digitally signed by Vijay K. Chaudhari
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d242787d25852443527f4a3927a849feec29ce26368b8badbee9e69852845f0a, cn=Vijay K. Chaudhari
Date: 2017.11.17 13:31:03 +05'30'

(वि.का.चौधरी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. प्रधान सचिव (जलसंपदा)/ सचिव (जलसंपदा व्यवस्थापन व लाक्षेवि) / सचिव (प्रकल्प समन्वय), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. सर्व कार्यकारी संचालक / महासंचालक, जलसंपदा विभाग.
३. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, औरंगाबाद

४. सर्व मुख्य अभियंता व सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई .
५. सर्व मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग.
६. महालेखापाल, महाराष्ट्र (लेखा व अनुज्ञेयता), १-मुंबई / २-नागपूर.
७. सर्व अधीक्षक अभियंता (स्थापत्य), जलसंपदा विभाग.
८. खाजगी सचिव, मा. मंत्री (जलसंपदा), मंत्रालय, मुंबई.
९. खाजगी सचिव, मा. राज्यमंत्री (जलसंपदा),मंत्रालय, मुंबई.
१०. संबंधीत अधिकारी.
११. संबंधीत जिल्हा कोषागार अधिकारी.
१२. सर्व कार्यासने जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई .
१३. कार्यासन आ (वर्ग-१), संग्रहार्थ.